# भारतीय महिला संघाचा विजय

## दक्षिण आफ्रिकेवर १५ धावांनी मात

**वृत्तसंस्था, कोलंबो**

**प्रतीका रावलची** (९१ चेंडूंत ७८) संयमी खेळी, त्यानंतर ऑफ-स्पिन गोलंदाज स्नेह राणाच्या (५/४३) भेदक माऱ्याच्या जोरावर भारतीय महिला संघाने तिरंगी एकदिवसीय क्रिकेट मालिकेतील दुसऱ्या सामन्यात मंगळवारी दक्षिण आफ्रिका संघावर १५ धावांनी मात केली. भारताचा हा सलग दुसरा विजय ठरला.

स्वच्छ सूर्यप्रकाशात प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यावर भारतीय संघाने निर्धारित ५० षटकांत ६ बाद २७६ धावांची मजल मारली. यामध्ये लय कायम ठेवलेल्या प्रतीकाच्या अर्धशतकी खेळीचा मोठा वाटा होता. आव्हानाचा पाठलाग करताना ताझमिन ब्रिट्सच्या (१०९) जिगरबाज खेळीनंतरही दक्षिण आफ्रिकेचा डाव स्नेहच्या फिरकीसमोर ४९.२ षटकांत २६१ धावांत आटोपला. स्नेहने एका षटकात तीन गडी बाद करताना सामना भारताच्या बाजूने फिरवला. तसेच तिने एकदिवसीय कारकीर्दीत प्रथमच सामन्यात पाच बळी मिळवले. दक्षिण आफ्रिका संघाने अखेरचे पाच फलंदाज केवळ २१ धावांत गमावले. त्यापूर्वी, प्रतीका रावलने सलग दुसरे अर्धशतक साकारले. तिने स्मृती मनधानाच्या (३८) साथीत ८३ धावांची सलामी दिली. मनधाना बाद झाल्यावर हरलीन देओलची (२९) प्रतीकाला सुरेख साथ लाभली.

### संक्षिप्त धावफलक

**भारत** : ५० षटकांत ६ बाद २७६ (प्रतीका रावल ७८, हरमनप्रीत कौर नाबाद ४१, जेमिमा रॉड्रिग्ज ४१; नोन्कुलुलेको मलाबा २/५९) **विजयी वि. दक्षिण आफ्रिका** : ४९.२ षटकांत सर्वबाद २६१ (ताझमिन ब्रिट्स १०९, अमेरी डेरेकसन ३०; स्नेह राणा ५/४३, दीप्ती शर्मा १/४०).

# भांडवली बाजारात निधी उभारणीत महाराष्ट्र अव्वल

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** राष्ट्रीय शेअर बाजाराने (एनएसई) प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, सरलेल्या २०२४-२५ आर्थिक वर्षात या शेअर बाजार मंचावर कंपन्यांनी समभाग सूचिबद्ध करून उभारलेल्या भांडवलाच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील अव्वल राज्य ठरले आहे. शेअर बाजाराच्या मुख्य मंचावरील निधी उभारणीची क्रिया ही मुख्यत्वे देशातील काही प्रमुख आर्थिक क्षेत्रांपुरतीच अद्याप मर्यादित आहे. यात महाराष्ट्र, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांतील कंपन्यांनी एकत्रितपणे १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला, ज्याचा सार्वजनिक समभाग विक्रीद्वारे (आयपीओ) उभारल्या गेलेल्या एकूण निधीत ६९ टक्के वाटा आहे. तर एकट्या महाराष्ट्राचा वाटा तब्बल ३२ टक्के राहिला आहे. इतकेच नाही तर सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग अर्थात एसएमई-केंद्रित 'एनएसई इमर्ज' या बाजारमंचावर महाराष्ट्रातील कंपन्यांचा एकूण निधी उभारणीच्या तुलनेत २७ टक्के वाटा २०२४-२५ मध्ये राहिला.

महाराष्ट्रासह, गुजरात आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्र या तीन प्रदेशांतील कंपन्यांनी 'एनएसई इमर्ज'वरून निधीचा एकूण उभारल्या गेलेल्या भांडवलाक एकत्रित ६२.१ टक्के वाटा होता. याचा अर्थ मोठ्या कंपन्यांसह आणि छोट्या कंपन्यांनाही वित्तीय स्रोत मिळवून देण्यात महाराष्ट्राची मजबूत कामगिरी राहिली आहे.

शहरानिहाय तुलना करायची झाल्यास, बंगळुरूने निधी उभारणीत अव्वल स्थान राखले आहे. तेथील १० कंपन्यांनी मुख्य बाजारमंचावर एकत्रितपणे २८,०६२ कोटी रुपये असा सर्वाधिक निधी उभारला. यापैकी बहुतेक कंपन्या या तंत्रज्ञान आणि ग्राहक क्षेत्रांतील आहेत. दरम्यान, तामिळनाडूतील कांचीपुरमने एकमेव ऐतिहासिक 'आयपीओ'द्वारे २०२४-२५ सूचीत दुसरे स्थान राखले. भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा 'आयपीओ' ठरलेल्या - ह्युंदाई मोटर इंडियाने या माध्यमातून २७,८५९ कोटी रुपये उभारले आहेत. नवी दिल्लीनेही जोरदार कामगिरी केली आणि तेथील १२ कंपन्यांनी २३,६१५ कोटी रुपये उभारले आहेत.

# 'सेन्सेक्स'ची आगेकूच कायम!

**मुंबई:** भू-राजकीय तणावाच्या चिंतेमुळे अत्यंत अस्थिर राहिलेल्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकांनी मंगळवारी सलग दुसऱ्या सत्रात वाढ नोंदवली. परदेशी भांडवलाचा निरंतर सुरू राहिलेला प्रवाह हा देशांतर्गत बाजारासाठी उत्साहदायी आणि आधार देणारा ठरला आहे. प्रारंभी ४४३ अंशांपर्यंत झेपावलेला सेन्सेक्स, दिवसाचे व्यवहार बंद होताना अवघ्या ७०.०१ अंशांच्या (०.०९ टक्के) माफक कमाईसह ८०,२८८.३८ वर स्थिरावला.

# सुदीरमन चषकातील आव्हान संपुष्टात

**शियामेन (चीन) :** ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो जोडीने मिश्र दुहेरीत विजयी सुरुवात करून दिल्यानंतरही पी. व्ही. सिंधू, एच. एस. प्रणॉय यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंना आलेल्या अपयशामुळे भारताला सुदीरमन चषक बॅडमिंटन स्पर्धेत मंगळवारी इंडोनेशियाविरुद्ध १-४ अशा पराभवाला सामोरे जावे लागले. सलग दुसऱ्या पराभवामुळे भारताचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.

भारताला डेन्मार्कविरुद्ध पहिल्या सामन्यातही १-४ अशी हार पत्करावी लागली होती. इंडोनेशियाविरुद्ध ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो जोडीने रेहान नौफल कुशारजंतो आणि ग्लोरिया इमॅन्युएल विडजा जोडीवर १०-२१, २१-१८, २१-१९ असा विजय मिळवला. त्यानंतर एकेरीत भारताचे सिंधू आणि प्रणॉय संघर्षच करताना दिसले. त्यानंतर महिला आणि पुरुषांच्या दुहेरी लढतीही भारताने गमावल्या.

# पंजाब किंग्जची चेन्नईशी गाठ

**चेन्नई :** गुणतालिकेत अव्वल चार संघांत स्थान मिळविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या पंजाब किंग्ज संघासमोर 'आयपीएल'मध्ये आज, बुधवारी चेन्नई सुपर किंग्ज संघाचे आव्हान असेल.

पाच वेळच्या विजेत्या चेन्नई संघासाठी यंदाचा हंगाम निराशाजनक ठरला आहे. चेन्नईला नऊपैकी सात सामन्यांत हार पत्करावी लागली असून 'प्ले-ऑफ'च्या शर्यतीतून ते जवळपास बाद झाले आहेत.

दुसरीकडे, गेल्या दोन सामन्यांत मिळून केवळ एक गुण मिळवता आल्याने पंजाबची पाचव्या स्थानी घसरण झाली आहे. मात्र, चेन्नईचा संघ लयीत नसल्याने त्यांना पराभूत करण्याची पंजाबकडे संधी आहे.

- **वेळ** : सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

## सावंतवाडी नगर परिषद, सावंतवाडी

E-mail - cosawantwadi@gmail.com
०२३६३-२७२५८८, २७२०४४

जा.क्र. सानप/बांध./२८७/२०२५-२६ दि. २९.०४.२०२५

### संक्षिप्त ई-निविदा सूचना क्र. ४ सन २०२५-२६

सावंतवाडी नगर परिषदेस सावंतवाडी नगर परिषदेच्या जिमखाना मैदान येथे सिंथेटिक लॉन टेनिस कोर्ट तयार करणे (फेर निविदा) हे काम करून घ्यावयाचे आहे. त्याकरिता शतवार दराच्या ई-निविदा मागविण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

या कामी निविदा ऑनलाइन भरण्याचा कालावधी दिनांक ३०.०४.२०२५ सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक ०८.०५.२०२५ रोजी दु. १५.०० वाजेपर्यंत असा आहे. या कामांबाबत इतर संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
सावंतवाडी नगर परिषद

## जाहीर प्रसिद्धीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) मुख्य नियम २०१४ व सुधारित नियम २०१७ चे नियम १८ मधील तरतुदीनुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (पुणे शहर) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ०५ यांच्या वैधानिक कार्यक्षेत्रातील ब प्रकारातील खालील सहकारी संस्थेचा निवडणूक कार्यक्रमाची घोषणा मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेली आहे. सदर निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव, पदनाम व मोबाईल क्रमांक | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याचा दिनांक व वेळ | मतदानाचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर-४, सहकार वैभव पहिला मजला, प्लॉट नं. ई-३, मार्केटींग फेडरेशन इमारत, पी.डी.सी.सी. बँकेशेजारी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७. दु. क्र.०२०-२४२६१९९३ | | | | | | |
| १ | श्री सह्याद्री नागरी सहकारी पतसंस्था मर्या., स. नं. ६८६/१ के, नाटेकर कॉलनी, प्लॉट नं. १५, बिबवेवाडी, पुणे-३७. | श्री. संतोष शिंगाडे, मुख्य लिपीक अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर- ४. मो. नं. ९९२१९११७४७ | दि. ३०/०४/२०२५ ते ०७/०५/२०२५, वेळ स.११.०० ते दु.०३.०० पर्यंत | दि. ०८/०५/२०२५, स.११.३० वाजता | दि. ०९/०५/२०२५ ते २३/०५/२०२५. स.११.०० ते दु.०३.०० पर्यंत | दि. ०७/०६/२०२५ स. ०९.०० ते ०५.०० |

टिप:-
१. उपरोक्त सर्व सहकारी संस्थांचे मतदार संघ, समितीची रचना, निवडणुकीच्या विविध टप्प्यांच्या तारखा व वेळ इत्यादीबाबतचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संबंधित उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांचे कार्यालय, संबंधित संस्था कार्यालय व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर पाहावयास मिळतील.
२. मतदान व मतमोजणीचे ठिकाण आवश्यकतेनुसार संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून जाहीर करण्यात येईल.
३. संबंधित संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

(सही)
(संजय राऊत)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (शहर), पुणे

ठिकाण: पुणे
दिनांक: ०५/०५/२०२५

## परिशिष्ट-IV-ए – स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्रि सूचना

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदीसंह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव-विक्रि सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तुर्बा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लँडमार्क, तनिष्क शोरुम जवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२००२.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या याखाली रकाना नं. "डी" मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक / प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिल्यानुसार ) **"मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"** / सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्रि याखाली दिलेल्या तपशीलानुसार **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे"** या तत्वावर करण्यात येणार आहे. ऋणको / गहाणकार / विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको / गहाणकारांचे ( दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **"मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"** / सुरक्षित धनकोच्या **www.pnbhousing.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

| लोन नं. / ऋणको / सह-ऋणको / हमीदार / विधि वारसदाराचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम व तारीख (बी) | ताब्याचे स्वरूप (सी) | गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी) | राखीव किंमत (आरपी) (ई) | इरठे (आरपीची १०%) (एफ) | बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी) | बोली वृद्धी दर (एच) | पाहाणीची तारीख व वेळ (आय) | लिलावाची तारीख व वेळ (जे) | ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| HOU/NSK/0817/416631 & NHL/NSK/1018/585309, धोंडिराम चिंतामण लोहारकें / मनिषा धोंडिराम लोहारकें - शाखा कार्यालय : नाशिक | रु. २५,०८,५९३.७४ व २३-०६-२०२१ | प्रत्यक्ष ताबा | फ्लॅट नं. बी १३, तळमजला, "श्रीमंत होम्स", बिल्डिंग "बी", सर्व्हे नं. ७९ २एव ७९ ४ए, मातोश्री प्रेरणा लॉन्ससमोर, साई पॅलेस हॉटेलच्या मागे, विजय नगर, मौजे भागूर, महाराष्ट्र-४२२५०२. | रु. २३,३८,०००/- | रु. २,३३,८००/- | ३०-०५-२०२५ | रु. १०,०००/- | २२-०५-२०२५ रोजी दु. १२:०० ते दु.०४:०० | ३१-०५-२०२५ रोजी दु.०२.०० ते दु. ०३:०० | * काही नाहीत / ज्ञात नाही |

* त्याकरिता वसुली आणि / किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. "के" मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर / सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार / दावे नाहीत. याअधिक, सदर भार वशस्वी खरीददार / बोलीदाराद्वारा, त्याच्या / तिच्याकडील, सोसावयाचे आहेत / प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार / बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भारगी स्वतंत्रीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.

(१) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची विक्रि करणे, अभिहस्तांतरण आणि / किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला / "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि / किंवा निषेधाज्ञा आलेली नाही. (२) भावी खरीददार / बोलीदार आणि स्वारस्य असलेल्या पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया / आदेश, इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादित नाहीत आणि निविदा / बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार / खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्रि किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्रि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्रि किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्रि विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्रि निश्चितीकरण पत्राच्या अधिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रि निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्रि निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता / सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रिकरिता ठेवण्यात येईल. (४) **"सीं१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड" ई-लिलावाद्वारा विक्रिच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले - प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट - www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा नोंदणीकरीता पाहाणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास श्री. गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल-फ्रि नं. : १८०० १२० ८८००, ईमेल : auction@pnbhousing.com, जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

स्थळ : नाशिक, दिनांक : २९.०४.२०२५ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड






हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.